# प्रसिध्दीपत्रक

**पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद सातारा अंतर्गत जिल्हा वार्षिक योजने (सर्वसाधारण योजना) अंतर्गत एकात्मिक कुक्कुट विकास कार्यक्रम सन २०१६-१७ अंतर्गत एक दिवशीय सुधारीत मिश्र कुक्कुट पिल्लांचे गट वाटप योजना :-**

एक दिवशीय सुधारीत कुक्कुट पक्षांच्या पिल्लांचे गट वाटप या कार्यक्रमांतर्गत सर्व प्रवर्गातील लाभार्थींना ५० टक्के अनुदानावर प्रति लाभार्थी एक दिवशीय सुधारीत कुक्कुट पक्षांच्या (आर.आय.आर., ब्लॅक ॲस्ट्रोलार्प, गिरीराज, वनराज, कडकनाथ व इतर शासन मान्य जातीचे पक्षी) १०० पिल्लांचे गट वाटप करणेत येणार आहे. एक गटाच्या (१०० एक दिवशीय पिल्लांची) खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १.एक दिवशीय १०० पिल्लांची किंमत | रुपये २०००/- |
| २.खाद्याऐवजी प्रत्येक लाभार्थीचे बँक खाते मध्ये जमा करावयाची रक्कम दोन टप्यामध्ये | रुपये ६०००/- |
| ३.बाहतूक खर्च | रुपये १००/- |
| ४.औषधे | रुपये १५०/- |
| ५.रात्रीचा निवारा | रुपये १०००/- |
| ६.खाद्याची भांडी | रुपये ३५०/- |
| ७.लाभार्थीने पक्षांना पुढील कालावधीसाठी दयावयाची खाद्याची रक्कम | रुपये ६४००/- |
| | एकूण १६०००/- |

त्यापैकी ५० टक्के अनुदानातून रु.८,०००/- चे मर्यादेत प्रति लाभार्थी एक दिवशीय पिल्ले (किंमत रु.२,०००/-) आणि खाद्याऐवजी प्रत्येक लाभार्थीचे बँक खाते मध्ये जमा करावयाची रक्कम दोन टप्यामध्ये (रु.६,०००/-) जमा करणेत येणार आहे. व उर्वरीत रु.८,०००/- खर्च लाभार्थीने करावयाचा आहे.

सदर योजनेअंतर्गत वरीलप्रमाणे रु.८,०००/- किंमतीचे ३९१ लाभार्थींना गट वाटप करणेकरीता लाभार्थींचे अर्ज मागविणेत येत आहेत. प्राप्त लाभार्थींची निवड व जिल्हा स्तरावर जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, सातारा यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीमार्फत निवड करणेत येणार आहे. त्यासाठी ३० टक्के महिला, ३ टक्के विकलांग लाभार्थी दारिद्रय रेषेखालील लाभार्थी, भूमिहीन शेतमजूर, मागासवर्गीय, अल्प व अत्यल्प भूधारक लाभार्थी यांना प्राधान्य क्रमाने निवड यादीत समावेश केला जाईल.

सदर योजनेकरीता लाभार्थीने करावयाच्या अर्जाचा नमुना पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती (सर्व)

यांचेकडे उपलब्ध होतील. अर्ज मागविणेची मुदत दि.०३/०८/२०१६ ते ३०/०८/२०१६ राहील. त्यांनतर प्राप्त होणा-या अर्जांचा विचार केला जाणार नाही. या पूर्वी या योजनेचा लाभ घेतलेल्यांना व एकदा लाभ घेतलेनंतर पाच वर्षापर्यंत या योजनेचा लाभ घेता येणार नाही. याची नोंद घ्यावी.

**जिल्हा पशुसंवर्धन, अधिकारी**
**सातारा जिल्हा परिषद,सातारा**

**एकात्मिक कुक्कुट विकास कार्यक्रमांतर्गत एक दिवशीय सुधारीत कुक्कुट पक्षांच्या पिल्लाचे गट वाटप योजनेअंतर्गत लाभार्थी निवडी करीता करावयाचा अर्ज**

## अर्जाचा नमुना

१) अर्जदाराचे नांव -
२) अर्जदाराचा संपूर्ण पत्ता -
३) अर्जदाराचे वय (अर्ज करावयाचे तारखेस) -
४) जात व संवर्ग -
५) कुक्कुट प्रशिक्षण पूर्ण केले असल्यास प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत -
६) रहिवाशी प्रमाणपत्र (ग्रामपंचायत /नगरपरिषद) -
७) पूर्वी कुक्कुट विषयक केलेल्या कामाचा तपशील -

प्रमाणित करतो/करते की, वरीलप्रमाणे दिलेली माहिती खरी आहे. ---------------------------------------- -------------------------------- या योजनेअंतर्गत योजनेतील अटी व शर्ती मला मान्य असून, याबाबत माझी कोणतीही तक्रार नाही.

स्थळ -
व पत्ता

स्वाक्षरी
अर्जदाराचे संपूर्ण नांव

दिनांक -

**टिप - आवश्यक तेथे पुष्ठयर्थ प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.**

१) ओळखपत्र
२) रेशन कार्ड
३) ७/१२ दाखला/उतारा
४) ८ अ उतारा/दाखला
५) अपत्याचा दाखला (स्वंय घोषणापत्र)
६) अल्प व अत्यल्प भूधारक असलेचा तलाठयाचा दाखला
७) जातीचा दाखला (आवश्यक असलेस)
८) भूमिहीन शेतमजूर असलेचा तलाठयाचा दाखला
९) दारिद्रय रेषेखालचा दाखला क्रमांकासह व गुणासह
१०) शासकीय सेवेत नसल्याचा दाखला
११) अंपग असल्यास दाखला
१२) यापुर्वी या योजनेचा लाभ घेतला आहे/नाही